# BDC LIBRARY
## News Paper Clipping
## A.Y. 2025-26

# पारंपरिक खेळांचे पुनरुज्जीवन गरजेचे

## प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड : पाटणला राष्ट्रीय चर्चासत्र

**वार्ताहर**
पाटण

पारंपरिक भारतीय खेळ मानवी आरोग्य जीवनासाठी महत्त्वाचे आहेत. आजच्या स्पर्धेच्या तसेच धकाधकीच्या जीवनात पारंपरिक भारतीय खेळ आरोग्यदायी जीवनाची गुरुकिल्ली असून पारंपरिक भारतीय खेळांचे पुनरुज्जीवन काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ.व्यंकटेश वांगवाड यांनी केले.



**पाटण : राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना प्रा. डॉ. व्यंकटेश वांगवाड.**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, श्री. रवळनाथ फायनान्स, गडहिंग्लज व वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये आयोजित दोन दिवसीय 'भारतीय पारंपारिक खेळ आणि शारीरिक शिक्षणातील मनोरंजक उपक्रम' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते. डॉ. सिंकूकुमार सिंग, डॉ. प्रशांत पाटील, डॉ.महेंद्र कदम-पाटील यांची उपस्थिती होती.

सदर चर्चासत्रासाठी २६० प्राध्यापक उपस्थित होते. नांदेड येथील डॉ. सिंकूकुमार सिंग यांनी बीजभाषण केले. प्रा. श्रीनिवास पवार व प्रा. माथणे यांनी सूत्रसंचालन केले. प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी आभार मानले.